Estd. 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परिपत्रक

विभाग व अधिविभागांना आदेशान्वये कळविण्यात येते की, मुद्रणालय विभागामध्ये छपाईचे काम देताना खालील बाबींची पुर्तता करावी.

१. छपाई कामासाठी देण्यात येणाऱ्या वर्कऑर्डरवर मा. कुलसचिव यांची स्वाक्षरी व प्रशासकीय मान्यतेची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

२. छपाई कामाचे प्रूफ दिल्यानंतर ते योग्यप्रकारे तपासून व सदर प्रूफवर तत्सम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेऊन छपाईस देण्यात यावे. छपाईचे काम पुर्ण झाल्यानंतर सदर कामामध्ये काही चूक असल्यास त्यास मुद्रणालय विभाग जबाबदार असणार नाही.

३. छपाई काम देतांना वर्कऑर्डरसोबत प्रशासकीय मान्यतेची झेरॉक्स प्रत, छपाई करावयाच्या कागदाचा प्रकार व नमूना जोडण्यात यावा. वार्षिक दरकराराअंतर्गत मंजूर असलेल्या कागदावरच छपाई करण्यात येईल. विभागाच्या मागणीनूसार अन्य कागदावर छपाई करण्यात येणार नाही. वार्षिक दरकराराअंतर्गत मंजूर कागदाव्यतिरिक्त इतर कागदावर छपाई करावयाची असल्यास कागद उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबधित विभागाची राहील.

४. मुद्रणालय विभागाकडून छपाई कामापोटीची देयके विभागाला दिल्यानंतर त्या आर्थिक वर्षामध्ये खर्ची पडत नसल्याने विदयापीठ लेखापरिक्षकांनी आक्षेप नोंदविलेले आहे. त्यानूसार विभागांनी देयक प्राप्त झाल्यानंतर सात दिवसामध्ये देयकाची प्रशासकीय मान्यता घेऊन मुद्रणालय विभागाकडे सत्वर देण्यात यावे.

५. छपाई कामाचे देयक त्या त्या आर्थिक वर्षात खर्ची टाकण्यात यावे. देयके प्रलंबित असल्यास छपाईसाठी पुढील काम घेण्यात येणार नाही.

६. छपाई कामाची सॉफ्ट कॉपी मुद्रणालय विभागाच्या **E-mail** वर अथवा **Pen Drive** द्वारे देण्यात यावी.

७. विद्यापीठाचा लोगो आस्थापना विभागाच्या मंजूरीप्रमाणे असावा.

८. जॉबची सॉफ्ट कॉपी सदर विभागाकडून मा. कुलसचिव यांच्या मान्यतेसह अंतर्गत कार्यालयीन टिपणी मुद्रणालय विभागास प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल.

९. इतर सूचना शिवाजी विदयापीठ/मुद्रणालय/6653 दि. 16.01.2017 रोजीच्या परिपत्रकानूसार राहतील.

21/12

कुलसचिव

शिवाजी वि./मुद्रणालय/- 479
दिनांक : 26 DEC 2019

प्रत :
सर्व विभागप्रमुख
सर्व अधिविभागप्रमुख
मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक
मा. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक
मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्वीय सहाय्यक
मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे यांचे स्वीय सहाय्यक
इंटरनेट विभाग (सदरचे परिपत्रक) संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.

SUK\Press\1.cdr